# MT 147

**2017 ___ ___ 1100**

**-MT-147- SOCIAL SCIENCE - HISTORY & POLITICAL SCIENCE (M)-**
**SEMI PRELIM I - PAPER - A**

**Time : 2 Hours** **(Model Answer Paper)** **Max. Marks : 40**

| | | |
|---|---|---|
| उ.१. | **(अ) कंसातील योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| (१) | क्रांतिसिंह नाना पाटलांनी **सातारा** जिल्ह्यात प्रतिसरकारची स्थापना केली होती. | 1 |
| (२) | अठराव्या शतकापर्यंत **आफ्रिका** हा खंड 'अज्ञात खंड' म्हणून ओळखला जात होता. | 1 |
| (३) | भारतातील पहिले अणुविद्युत केंद्र **तारापूर** येथे उभारण्यात आले. | 1 |
| उ.१. | **(ब) 'अ' स्तंभ व 'ब' स्तंभ यांच्या योग्य जोड्या लावा.** | |
| (१) | भारत - लोकशाही | 1 |
| (२) | याल्टा करार - फेब्रुवारी, १९४५ | 1 |
| (३) | दुसरा लिओपोल्ड - बेल्जियमचा राजा | 1 |
| उ.२. | **खालील प्रश्नांची २० ते ३० शब्दांत उत्तरे लिहा : (कोणतेही दोन)** | |
| (१) | (१) विज्ञानातील ज्ञानाच्या आधारे विविध साधनांची निर्मिती करून मानवी जीवन सुखी करण्यात येते. त्यातून तंत्रज्ञानाचा उदय होतो.<br>(२) तंत्रज्ञान हे विज्ञानातून आकारास येते ''तंत्रज्ञान म्हणजे ज्ञानाचा व्यवहारातील उपयोग होय.''<br>(३) निसर्गावर विजय मिळवण्यासाठी व मानवाचे जीवन सुखी करण्यासाठी निर्माण झालेल्या साधनांचे व यंत्रांचे ज्ञान म्हणजे तंत्रज्ञान होय.<br>(४) ''मानवी जीवन सुखी व समृध्द करण्यासाठी विज्ञानातून निर्माण झालेल्या साधनांचे व यंत्रांचे ज्ञान म्हणजे तंत्रज्ञान होय.''<br>(५) वाफेच्या अंगी असणाऱ्या शक्तीचा शोध म्हणजे विज्ञान होय. तर या शक्तीचा वापर करून केलेले रेल्वे इंजिन म्हणजे तंत्रज्ञान होय. | 2 |
| (२) | (१) १९ व्या शतकात युरोपातील धाडसी प्रवासी मंगोपार्क, कॅप्टन स्पेक, सर सॅम्युएल बेकर, डेव्हिड लिव्हिंगस्टन व अमेरिकन वृत्तपत्रकार एच. एम. स्टॅन्ले यांनी अथक प्रयत्न करुन आफ्रिकेच्या अंतर्गत भागाची माहिती मिळविली.<br>(२) स्टॅन्लेने महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध करुन पाश्चिमात्त्यांना आफ्रिकेची ओळख करुन दिली.<br>(३) औद्योगिकीकरण, वाढती लोकसंख्या, साम्राज्यवाद आदी कारणांमुळे युरोपियन राष्ट्रांचे लक्ष आफ्रिका खंडाकडे वेधले गेले.<br>(४) औद्योगिक क्रांतीनंतर कच्चा माल मिळवण्यासाठी व पक्का माल विकण्यासाठी व्यापाराच्या दृष्टीने आफ्रिका ही युरोपीय राष्ट्रांसाठी नवी बाजारपेठ म्हणून मिळणार होती. म्हणून युरोपीय राष्ट्रांचे लक्ष आफ्रिकेवर केंद्रिभूत झाले. | 2 |

| | | |
|---|---|---|
| (३) | (१) जागतिकीकरण म्हणजे सर्व राष्ट्रांची एक बाजारपेठ निर्माण करणे आणि त्या बाजारपेठेत जगातील साधनसामग्रीचे आणि भांडवलाचे सुलभ परिचलन (Circulation) निर्माण करणे.<br>(२) आर्थिक स्थितीशी निगडीत असलेले जागतिकीकरण आज सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील मोठ्या प्रमाणात बदल घडवत आहे.<br>(३) आंतरराष्ट्रीय कंपन्या, नवीन तंत्रज्ञान, नवीन स्पर्धा, विविध देशात गुंतवणुकीची संधी, परकीय चलनाची उपलब्धता, शहरांचा विकास, माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर, उपग्रहांद्वारे दळणवळण इत्यादी क्षेत्रात बदल घडून आलेले आहेत.<br>(४) १९४१ साली धाडसाने आपल्या अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण केले आहे. | 2 |
| उ. ३. | **खालील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत कारणे लिहा : (कोणतेही दोन)** | |
| (१) | (१) पॅरिस शिखर परिषदेची जय्यत तयारी सुरू असतानाच अमेरिकेचे 'यू-२' जातीचे हेरगिरी करणारे एक विमान रशियाने आपल्या हद्दीत पाडले.<br>(२) हेरगिरीच्या घटनेने रशियाचा भ्रमनिरास झाला. त्याने अमेरिकेवर शांततेचा भंग करीत असल्याचा आरोप केला.<br>(३) अमेरिकन अध्यक्षांनी रशियाची गुप्तपणे चाललेली लष्करी तयारी जाणून घेण्याचे कारण सांगून विमान हेरगिरीसाठी पाठविल्याचे समर्थन केले.<br>(४) १९ मे १९६० रोजी पॅरिस शिखर परिषद झाली. या परिषदेत रशियन अध्यक्ष निकिता क्रुश्चेव्ह यांनी 'यू-२' विमानाचा प्रश्न उपस्थित करून अमेरिकेचा निषेध केला म्हणून 'यू-२' च्या घटनेमुळे शीतयुध्दात वाढ झाली. | 2 |
| (२) | (१) आर्थिक वाढीचा वेग ८% पर्यंत वाढला आहे.<br>(२) नव्या तंत्रज्ञानामुळे शहरांची भरमसाठ वाढ होत आहे परंतु काही प्रमाणात खेडी विकासापासून वंचित राहिली आहेत असे असले तरी भारताने शेती क्षेत्रात प्रचंड प्रगती केली.<br>(३) एकेकाळी अन्नधान्य आयात करणारा आपला देश आज सुमारे एकवीस देशांना अन्नधान्यांची निर्यात करत आहे.<br>(४) भारताच्या विकासाचा दर ६% वर गेला आहे. म्हणून विकसनशील देशांसाठी जागतिकीकरण हे वरदान ठरले आहे. | 2 |
| (३) | (१) भारतात अणुविज्ञानाच्या संशोधनासाठी इ.स १९४५ मध्ये 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च' व इ.स.१९४८ मध्ये 'अणुशक्ती मंडळाची' स्थापना भारत सरकारने केली याचे संचालक पद डॉ. होमी भाभा यांच्या कडे होते.<br>(२) मुंबईजवळ तुर्भे येथे डॉ. भाभा यांच्या मार्गदर्शनाखाली 'अणुशक्ती संशोधन नगरी' ची उभारणी करण्यात आली.<br>(३) या नगरीमध्ये अप्सरा, सायरस, झर्लिन व पौर्णिमा या अणुभट्ट्या आहेत. या अणुभट्ट्यांच्या माध्यमातून अणुविज्ञानाचा अभ्यास केला जातो. तुर्भे येथील केंद्रात सुमारे ३५० किरणोत्सारी पदार्थांची निर्मिती केली जाते. त्यांचा उपयोग उद्योग, शेती व वैद्यक क्षेत्रात केला जातो. | 2 |

| | | |
|---|---|---|
| | (४) देशाने डॉ. भाभा यांच्या कार्याचा गौरव म्हणून तुर्भे येथील अणुशक्ती संशोधन नगरीस 'भाभा अणुसंशोधन केंद्र' असे नाव दिले. | |
| उ.४. | **खालील प्रश्नांची ४० ते ५० शब्दांत उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** | |
| (१) | (१) म. गांधींनी ब्रिटिश सरकारनी केलेल्या अन्यायी, अत्याचारी कायद्याच्या विरोधात सविनय कायदेभंगाची चळवळ सुरु केली.<br>(२) सविनय कायदेभंगाच्या चळवळीसाठी मीठ या जीवनावश्यक वस्तूची निवड केली. मिठावरील कराचा बोजा प्रत्येक भारतीयाला सहन करावा लागत होता. मिठावरील कर रद्द करावा अशी मागणी काँग्रेसने अनेक वर्षांपासून केली होती. पण ती फेटाळली गेली.<br>(३) म्हणून म. गांधींनी मिठाचा कायदा मोडून काढण्यासाठी सविनय कायदेभंगाची चळवळ आखली आणि त्यासाठी गुजरातमधील 'दांडी' हे गाव निश्चित केले.<br>(४) १२ मार्च, १९३० रोजी आपल्या निवडक अनुयायांसह साबरमती आश्रमातून दांडीकडे वाटचाल सुरु केली. म. गांधी व त्यांच्या सहकाऱ्यांनी साबरमती ते दांडी ३८५ किलोमीटरचे अंतर २५ दिवसांत चालून पूर्ण केले.<br>(५) ६ एप्रिल, १९३० रोजी दांडीच्या समुद्रकिनाऱ्यावरील मीठ उचलून त्यांनी कायदेभंग केला व देशभर कायदेभंगाच्या चळवळीला सुरुवात झाली.<br>(६) सविनय कायदेभंगाच्या चळवळीमध्ये 'धारासना सत्याग्रह' महत्त्वाचा होता. या सत्याग्रहाचे नेतृत्व सरोजिनी नायडू यांनी केले होते. | 3 |
| (२) | (१) आशिया, आफ्रिका खंडांमध्ये युरोपीयन राष्ट्रांनी निर्माण केलेल्या वसाहतवादाचा अंत २० व्या शतकाच्या शेवटी झाला. त्याला 'निर्वसाहतीकरण' असे म्हणतात.<br>(२) निर्वसाहतीकरणाच्या प्रक्रियेला दुसऱ्या महायुध्दानंतर सुरुवात झाली.<br>(३) २० व्या शतकाच्या उत्तरार्धात वसाहतवादाचा शेवट झाल्याने त्याला 'निर्वसाहतीकरणाचे युग' असे म्हणतात.<br>(४) आशिया व आफ्रिका खंडातील जी राष्ट्रे इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, पोर्तुगाल या राष्ट्रांच्या ताब्यात होती.<br>(५) ती राष्ट्रे या कालावधीमध्ये एकामागून एक स्वतंत्र झाली. | 3 |
| (३) | (१) अमेरिकेने आर्थिक विकासाच्या दृष्टीकोनातून यशस्वी अशी मार्शल योजनेची आखणी केली.<br>(२) इंग्लंड आणि फ्रान्स यांनी सेवाज प्रांतातून पळ काढला. त्यामुळे अतिपूर्वेकडील राजकीय पाठबळ कमजोर झाल्यामुळे त्या भागात प्रबळ सत्ता उरली नाही.<br>(३) रशियाने या संधीचा फायदा घेतला आणि आपले नौदल सिरिया भागात पाठवले.<br>(४) रशियास शह देण्यासाठी मध्यपूर्वेतील लष्करी तळ मजबूतीकरण व नवे आरमारी तळ उभे करण्यासाठी अमेरिकन अध्यक्ष आयसेन हॉवर यांनी 'आयसेन हॉवर सिद्धांत' जाहीर केला.<br>(५) आयसेन हॉवरच्या सिद्धान्तानुसार अमेरिकन राष्ट्राध्यक्षांवर अमेरिकन संसदेने अनेक महत्त्वपूर्ण अधिकार दिले. | 3 |

| | | |
|---|---|---|
| | (६) मध्यपूर्वेतील स्वातंत्र्य टिकविणे, तेथील आर्थिक स्थिती मजबूत करणे, लष्करी मदत वा सहकार्य देणे. मध्यपूर्वेतील एखाद्या राष्ट्रावर साम्यवादी राष्ट्राचे आक्रमण झाल्यास त्यास लष्करी मदत करणे आणि महत्त्वाची बाब म्हणजे अमेरिकन सेना व शस्त्रास्त्रे वापरण्याचे अधिकार अध्यक्षांना देण्यात आल्यामुळे शीतयुद्ध भडकले. | |
| उ.५. | **खालील प्रश्नांची ६० ते ८० शब्दांत उत्तरे लिहा : (कोणतेही दोन)** | |
| (१) | अनेक देशांनी आपले कृत्रिम उपग्रह (Satellites) अवकाशात सोडले आहेत. अवकाशात अनेक उपग्रह पृथ्वीच्याभोवती फिरत आहेत. त्या उपग्रहांची माहिती खालीलप्रमाणे :<br>(१) रशिया, अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, चीन, भारत इ. देशांनी आपले अनेक कृत्रिम उपग्रह (Satellites) अवकाशात सोडले आहेत. कृत्रिम उपग्रह अग्निबाणाच्या सहाय्याने अवकाशात पाठविले जातात.<br>(२) कृत्रिम उपग्रहाचे दोन प्रकार असतात.<br>(१) **भूस्थिर उपग्रह** - भूस्थिर उपग्रह प्रक्षेपण यानाच्या सहाय्याने पृथ्वीपासून अवकाशात साधारणतः ३३००० ते ३५००० किलोमीटर उंचीवर स्थिर केले जातात. पृथ्वी ज्या वेगाने स्वतःभोवती फिरते त्याच वेगाने हे उपग्रह फिरतात. भारताचे उपग्रह सतीश धवन अवकाश केंद्र, 'श्रीहरीकोटा' येथून अवकाशात पाठविले जातात.<br>(२) **ध्रुवीय उपग्रह** - ध्रुवीय उपग्रह प्रक्षेपण यानाच्या सहाय्याने पृथ्वीपासून अवकाशात ८०० ते ८५० किलोमीटर उंचीवर पाठविले जातात. हे उपग्रह उत्तर ध्रुवापासून दक्षिण ध्रुवापर्यन्त व तेथून परत उत्तर ध्रुवापर्यंत अशी पृथ्वी प्रदक्षिणा करतात.<br>(३) कृत्रिम उपग्रहाचे फायदे :<br>(१) दूरदर्शनचे कार्यक्रम प्रक्षेपित केले जातात.<br>(२) दूरध्वनी, मोबाईल यांचा दळणवळणासाठी वापर होतो.<br>(३) हवामानाचा अभ्यास केला जातो.<br>(४) भूपृष्ठाचे चित्रीकरण व नकाशे तयार केले जातात.<br>(५) भूपृष्ठावरील नैसर्गिक साधन संपत्तीचा अभ्यास केला जातो. | **4** |
| (२) | (१) पाश्चिमात्य राष्ट्रांनी आफ्रिकेत निर्माण केलेल्या व्यापार, उद्योगधंदे यातील एक भाग म्हणजे 'गुलामांचा व्यापार' होय.<br>(२) ह्या सर्व उद्योगधंद्यात मुख्यतः हस्तीदंत, सोने, खनिज व गुलाम यांचा समावेश होता. त्यामुळे 'गुलामांचा व्यापार' हाच प्रमुख उद्योग होता.<br>(३) पोर्तुगीज व्यापाऱ्यांनी सर्वप्रथम आफ्रिकी गुलाम आपल्या देशात नेले. गुलामांचा व्यापार आफ्रिकेत फार जुन्या काळापासून चालायचा.<br>(४) शतकानुशतके अरब व्यापारी येथून गुलाम पळवून नेत व त्यांची मोठ्या प्रमाणावर पश्चिम आशियातील देशात विक्री करत असत.<br>(५) आफ्रिकेतील मागासलेपणाचा फायदा घेवून पाश्चिमात्य लोकांनी निग्रो जमातीत आपापसात भांडणे लावली. त्यांच्यात गुलाम पकडण्यासाठी लढाया सुरू झाल्या. | **4** |

(६) लढायांत पकडण्यात आलेले कैदी गुलाम म्हणून व्यापाऱ्यांना विकण्यात येत.
(७) लोकांना बळजबरीने पकडून गुलाम बनविले जाई व त्यांच्या कडून कष्टाची कामे करण्यासाठी नव्याने स्थापन झालेल्या युरोपीयन वसाहतीत गुलाम म्हणून त्यांना विकण्यात येत असे.
(८) कालांतराने पुढे गुलामांच्या व्यापारामागील अमानुषता, निर्दयीपणा व त्यांच्यावर होत असलेले अन्याय, अत्याचाराची माहिती युरोपातील सामान्य जनतेला कळू लागली.
(९) तेव्हा साहाजिकच निग्रो-गुलामांबद्दल सहानुभूती निर्माण होवून त्यांच्या मुक्ततेसाठी मोठ्या प्रमाणावर चळवळी निर्माण झाल्या.

(३) 'शीतयुध्द'(Cold War) या शब्दप्रयोगाचा प्रथम वापर अमेरिकन मुत्सदी बर्नार्ड बरुश यांनी जागतिक तणावपूर्ण परिस्थिती संदर्भात केला. तर प्रा. यंग-हूम-किम यांनी शीतयुध्दाबाबत, ''शीतयुद्ध म्हणजे मुक्त अर्थव्यवस्थेचे जग व साम्यवादी जग म्हणजेच पर्यायाने अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यातील ताणतणाव व संघर्ष होय'' असे म्हटले आहे. अशा शीतयुध्दाचे परिणाम पुढीलप्रमाणे - **4**

**(१) जगाची दोन गटात विभागणी :**
- (१) सुरूवातीस शीतयुध्दाचा प्रभाव वैचारिक होता. साम्यवादाविरोधी भांडवलशाही व लोकशाही असा हा लढा होता.
- (२) साम्यवादाची धुरा रशियाकडे होती तर भांडवलशाही व लोकशाहीची धुरा अमेरिकेकडे होती.
- (३) पुढील काळात वैचारिक संघर्ष बाजूस पडून सत्ता संतुलनाची राजकीय स्पर्धा सुरू झाली. याचा परिणाम म्हणून अमेरिका व रशिया यांच्यात जगाची विभागणी झाली.

**(२) शस्त्रास्त्र स्पर्धेत वाढ :**
- (१) अमेरिका व रशिया यांची प्रभावी सत्ता शस्त्रास्त्रांवर आधारलेली होती. त्यांनी आपल्या गटातील राष्ट्रे शस्त्रसज्ज बनविण्यावर भर दिला.
- (२) भूदल, नौदल व वायूदल ही लष्कराची तिन्ही दले सुसज्ज बनविण्यात आली. तिन्ही दलात समन्वय साधणारी समर्थ प्रशासन यंत्रणा निर्माण केली.
- (३) लांब पल्ल्याची आधुनिक क्षेपणास्त्रे, रडारवर न दिसणारी लढावू विमाने व अत्याधुनिक पाणबुड्यांची निर्मिती करण्यात आली.
- (४) त्यातून जीवघेणी शस्त्रास्त्र स्पर्धा सुरु झाली. हा शीतयुध्दाचा विघातक परिणाम होय.

**(३) अण्वस्त्र स्पर्धेला प्रोत्साहन :**
- (१) अमेरिका व रशिया या दोन्ही महासत्तांनी अण्वस्त्र वाहून नेऊ शकणारी क्षेपणास्त्रे, अणुशक्तीवर चालणारी विमाने व पाणबुड्या यांची मोठ्या प्रमाणात निर्मिती केली.
- (२) शीतयुध्दाने अण्वस्त्र स्पर्धेला प्रोत्साहन मिळून जग सर्वनाशाच्या उंबरठ्यावर उभे राहिले.

**(४) संयुक्त राष्ट्रसंघाची अप्रतिष्ठा झाली :**
- (१) संयुक्त राष्ट्रसंघ (यूनो) आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता या उद्दिष्टांची परिपूर्ती करण्यामध्ये काही अंशी यशस्वी झाला.
- (२) युनोने सर्वांपुढे एका विश्वाची कल्पना ठेवली होती. पण शीतयुध्दामधून निर्माण झालेली शस्त्रस्पर्धा, जगाची दोन परस्पर विरोधी गटात विभागणी झाली त्यामुळे युनोपुढे अनेक अडचणी निर्माण झाल्या.

(३) बड्या राष्ट्रांना मिळालेल्या नकाराधिकारामुळे (VETO POWER) युनोपुढे आलेले अनेक गंभीर प्रश्न सुरक्षा मंडळाकडून सुटू शकले नाहीत.

(४) शीतयुध्दामुळे 'वसुधैव कुटुंबकम' हे ध्येय असणाऱ्या युनोची अप्रतिष्ठा झाली.

(५) **मानव कल्याणाकडे दुर्लक्ष झाले :**

(१) शीतयुध्दामुळे जगभर भीती व दहशत निर्माण झाली. यातूनच शस्त्रास्त्र स्पर्धा वाढली.

(२) शस्त्रास्त्र निर्मितीवर प्रचंड पैसा खर्च होऊ लागला.

(३) विकासाची कामे मागे पडू लागली.

(४) रशियाने आपल्या उत्पन्नाच्या सुमारे २५ टक्के रक्कम शस्त्रनिर्मिती व शस्त्रसंशोधनावर खर्च केली. त्यामुळे तेथे जीवनाश्यक वस्तूंच्या निर्मितीकडे दुर्लक्ष होऊन त्यांची टंचाई निर्माण झाली.

(५) लोकांच्या जीवनमानावर त्यांचा विपरित परिणाम झाला.

(६) शीतयुध्दामुळे मानवी कल्याणाकडे दुर्लक्ष झाले.

(६) **अलिप्त राष्ट्रांच्या चळवळीची वाढ :**

(१) शीतयुध्दकाळात अनेक राष्ट्रांना आर्थिक व राजकीय दबावामुळे नाईलाज होऊन महासत्तांच्या गटात सामील व्हावे लागले.

(२) परंतु कोणत्याही गटात सामील न होता भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु, युगोस्लाव्हियाचे अध्यक्ष मार्शल टिटो व इजिप्तचे अध्यक्ष जनरल गमाल अब्दुल नासर या प्रमुख राष्ट्रांनी अलिप्त राष्ट्र चळवळ सुरू केली.

(३) ही चळवळ दिवसेंदिवस प्रभावी बनत गेली.

(४) महासत्तांनी याची दखल घेऊन शीतयुध्दाची तीव्रता कमी केली.

## राज्यशास्त्र

उ. ६. **रिकाम्या जागा भरा :**

(१) टोकाची **विषमता** असेल तर लोकशाही धोक्यात येते. 1

(२) भारतात दर १० वर्षांनी जनगणना होते. 1

(३) **मतदान** ही प्राथमिक राजकीय कृती आहे. 1

उ. ७. **एका वाक्यात उत्तरे लिहा : (कोणतेही तीन)**

(१) सामाजिक दडपणाची उदाहरणे पुढीलप्रमाणे : 1

(१) आंतरजातीय विवाहाला कायद्याने मान्यता आहे. पण आजही अशा विवाहांना विशेष मान्यता नाही. उलट लोक अशा विवाहांच्या विरूध्द असतात. त्यामुळे आंतरजातीय विवाह करू नये असे सामाजिक दडपण आपोआपच तयार होते.

**किंवा**

(२) शासनाने स्त्रियांच्या समान अधिकाराबद्दल कायदे केले आहेत. पण आजही स्त्रियांना विशिष्ट शिक्षण किंवा एखादी नोकरी व्यवसाय करण्यास समाजाची मान्यता नसेल तर स्त्रियांच्या स्वातंत्र्यावर बंधने येतात.

| | | |
|---|---|---|
| (२) | भाषिक आणि प्रादेशिक विविधता असली की अनेक वेळा देशांतर्गत प्रदेशांना स्वतंत्रपणे काही अधिकार दिले जातात. या व्यवस्थेला 'संघराज्य पद्धत' असे म्हटले जाते. | 1 |
| (३) | आपल्यापेक्षा इतरांचे मत वेगळे असू शकते हे मान्य करून वेगळे मत मांडण्यास इतरांना मोकळीक देणे म्हणजेच सहिष्णुता होय. | 1 |
| (४) | भाषा, प्रदेश, देश हे असे जन्मावर ठरणारे आणि वेगळेपण निर्माण करणारे मुख्य घटक सांगता येतील. | 1 |
| (५) | होय, हा मर्यादीत राजकीय सहभाग आहे. पण फक्त वाढत्या किमतींवर चर्चा करणे पुरेसे नाही. तर लोकांनी स्वतःहून त्याबाबत तक्रार करावी, त्यावर उपाययोजना व्हावी म्हणून त्याचा पाठपुरावा करावा. | 1 |
| उ. ८. | **चूक की बरोबर सहकारण सांगा : (कोणतेही दोन)** | |
| (१) | **चूक -**<br>कारण; (१) आंतरजातीय विवाह कायद्याला मान्य आहे.<br>(२) पण समाज मात्र अशा विवाहांना विशेष मान्यता देत नाही.<br>(३) उलट अनेक लोक अशा विवाहाच्या विरूध्दच असतात. | 2 |
| (२) | **बरोबर -**<br>कारण; (१) सगळे समाज पूर्वीपेक्षा जास्त विविधतापूर्ण बनले.<br>(२) त्याचा परिणाम त्यामुळे आपल्यापेक्षा वेगळ्या लोकांबरोबर वेगळ्या समाजात लोक राहू लागले. | 2 |
| (३) | **बरोबर -**<br>कारण; (१) अमेरिकेत अमर्याद व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार केला आहे.<br>(२) नागरीकांची सुरक्षा हे सरकारचे कर्तव्य आहे.<br>(३) पण ते पार पाडत असताना व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच (मर्यादा) होता कामा नये. अशी नागरीकांची अपेक्षा आहे.<br>(४) इतकेच नव्हे तर, शस्त्र बाळगण्यावरती निर्बंध असावेत ह्याला व्यक्तिस्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्यांचा विरोध आहे. | 2 |
| उ. ९. | **खालील प्रश्नांची २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा : (कोणताही एक)** | |
| (१) | लोकशाहीपुढे जे अनेक प्रश्न निर्माण होतात त्यांचे स्वरूप दुहेरी असते.<br>(१) लोकशाहीत प्रश्न लोकशाही मार्गानेच सोडवावे लागतात, कायदा, व्यक्तिस्वातंत्र्य आणि सहिष्णुता यांच्या आधारेच सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक असते. तसे केले नाही तर प्रश्न सुटले तरी लोकशाही राहणार नाही. | 2 |

| | | |
|---|---|---|
| | (२) लोकशाहीपुढे असणारा दुसरा प्रश्न म्हणजे लोकहित कसे जपायचे हा असतो. लोकशाहीची नुसती कायदेशीर तरतूद असणे पुरेसे नसते, तर सतत सार्वजनिक हित साधले जाईल आणि विषमतेचा सामना केला जाईल अशी धोरणे लोकशाही पध्दतीने शोधावी आणि राबवावी लागतात.<br>(३) खरी लोकशाही म्हणजे लोकशाही मार्गाने सर्व समाजाचे हित सतत सांभाळणारी व्यवस्था विकसित करणे होय. | |
| (२) | (१) देशात भाषिक आणि प्रादेशिक विविधता असली की अनेक वेळा देशांतर्गत प्रदेशांना स्वतंत्रपणे काही अधिकार दिले जातात. या व्यवस्थेला संघराज्य पध्दती असे म्हटले जाते.<br>(२) संविधानाद्वारे प्रादेशिक शासनांची निर्मिती केली जाते. म्हणजे संविधानामध्येच केंद्र व राज्य सरकार यांचे अधिकार नमूद केले जातात. त्यामुळे प्रत्येक प्रदेशातील जनतेला स्थानिक गरजेप्रमाणे निर्णय घेता येतात.<br>(३) कोणत्याही प्रदेशावर त्याची भाषा, संस्कृती किंवा स्थानिक चालीरीती या बाबींविषयीचे निर्णय लादले जात नाहीत.<br>(४) प्रादेशिक सरकारांना कोणते किंवा किती अधिकार असावेत याचा निर्णय त्या-त्या देशाच्या संविधानात केलेला असतो. अशा प्रकारे प्रादेशिक सत्ता वाटप हा विविधता टिकवून लोकशाही पध्दतीने कारभार करण्याचा एक प्रमुख मार्ग आहे. भारतात आपण अशी संघराज्य पध्दती स्वीकारलेली आहे.<br><br>❖❖❖❖ | 2 |